# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-09.09.2026** **वार- बुधवार**

---

**मेट्रो**

गणेशोत्सव काळात प्रवाशांच्या सोयीसाठी पुणे मेट्रो फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून - 14 ते 25 सप्टेंबर या काळात गर्दीच्या वेळेत दर ५ मिनिटांच्या अंतराने मेट्रो गाड्या उपलब्ध आहेत. १७ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर दरम्यान सकाळी ६ ते मध्यरात्री २ वाजेपर्यंत मेट्रो सुरू राहील. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीच्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून सलग २६ सप्टेंबर च्या रात्री ११वाजेपर्यंत - ४१ तास - पुणे मेट्रो सेवा अखंडपणे सुरू राहील असं पुणे मेट्रो नं कळवलं आहे.

**पर्यावरणपूरक**

गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि शाश्वत पद्धतीनं साजरा करण्यासाठी नागरिकांनी शाडू मातीच्या तसंच नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या मूर्तींना प्राधान्य देण्याचं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केलं आहे. गणेशमूर्तींचं विसर्जन नदी, नाला अथवा तलावात न करता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम हौद अथवा कृत्रिम जलकुंडातच कराव , असंही त्यांनी सांगितलं .

**रामनाथ झा**

अनधिकृत - अनियंत्रित बांधकामे, अपुरी गृहनिर्माण व्यवस्था आणि अनौपचारिक वसाहतींचा विस्तार याबाबत - नगर प्रशासन आणि शहरी प्रशासन तज्ज्ञ डॉ. रामनाथ झा यांनी चिंता व्यक्त केले आहे. पुण्यातल्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स १५ व्या पद्मभूषण पी. आर. दुभाषी व्याख्यानात ते काल बोलत होते. शहरी नियोजनामध्ये हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याची क्षमता विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. असं झा यांनी सांगितलं.

**स्मृतिशिल्प**

माजी लष्कर प्रमुख दिवंगत जनरल अरुणकुमार वैद्य यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त, त्यांचं माध्यमिक शिक्षण झालेल्या, न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत त्यांच्या स्मृतिशिल्पाचं अनावरण आज करण्यात आलं. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रावत, उपाध्यक्ष अशोक पलांडे, वैद्य यांच्या कन्या पारिजात बलिअप्पा, नीता कोचर आणि जावई ब्रिगेडियर अरुण कोचर यावेळी उपस्थित होते.

**मोडेल स्कूल**

पुण्यातील राजीव गांधीनगर इथल्या महापालिकेच्या चार एकर जागेवर अत्याधुनिक 'मॉडेल स्कूल' उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असून ६२ कोटी रुपये खर्चाच्या या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण

दिलं जाईल.  अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पत्रकार परिषदेत दिली.  याचा लाभ सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांना होणार आहे.

**खत**

अनुदानित खतांसोबत इतर खतांची किंवा कृषी निविष्ठांची जोडणी  करण्याची सक्ती केली जात असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं केला आहे. लिंकिंग नाकारल्यास खतांची जादा दराने विक्री केली जात आहे. ही सक्ती तातडीने थांबवावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी दिला आहे.

**जमीन संपादन**

राज्यातील शक्तिपीठ महामार्गासाठी पुणे विभागातील चार जिल्ह्यांमध्ये सुमारे ६ हजार २०० हेक्टर खासगी जमीन संपादित करण्यात येणार आहे. यासाठी जमिनींची संयुक्त मोजणी करण्यात येणार असून, मार्च २०२७ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचं  नियोजन असल्याची माहिती विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली. शक्तिपीठ महामार्ग पुणे विभागातील चार जिल्ह्यांतून जाणार असून, या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात खासगी जमीन संपादित करावी लागणार आहे.

**ड्रीपबॉल**

पहिल्या दक्षिण आशियाई ड्रीप बॉल स्पर्धेत बाणेर इथल्या  डॉ कलमाडी शामराव हायस्कूलच्या  - कार्तिकी डोके हिनं महिला खुल्या गटात तर शौर्य राशीनकर यानं सतरा वर्षाखालील मुलांच्या गटात - सुवर्ण पदक पटकावलं आहे. नेपाळच्या  काठमांडू इथे नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत भारतानं अजिंक्यपद मिळवलं.
भारत, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ असे  चार देश या स्पर्धेत सामील झाले होते. नेपाळ उपविजेता तर पाकिस्तान तिसऱ्या स्थानावर आला.

**कथक**

पुण्यातील लयोम इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स अँड मीडियाचा सोळावा वर्धापनदिन ‘आवर्तन २०२६’ या कथक नृत्याविष्काराने साजरा झाला. कोथरूडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सहा ते पन्नास वयोगटातील १२५ नृत्यांगनांनी अनेक बहारदार रचना सादर केल्या. तनिष्का कुलकर्णीला ‘स्टुडंट ऑफ द इयर’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**हवामान**

आज पुण्यातलं कमाल तापमान  31 अंश तर किमान 20 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस नोंदवल  गेलं . उद्याही कमाल 30 तर किमान 21 अंश तापमान राहील असा अंदाज आहे. आज काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी पडल्या. उद्याही अशीच परिस्थिती असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**